मनूच्या आईनं मनूला पोहायला शिकवायच ठरवल. एके दिवशी संध्याकाळी ती मनूला घेऊन पोहण्याच्या तलावावर गेली. मनूने बघितलं तर काय, एक मोठा चौकोनी तलाव होता. मोठ्या हौदासारखा. त्यातल पाणी निळं निळंशार दिसत होत. पाण्यात खूप माणसं पोहत होती. मुले काठावर उभे राहून पाण्यात उड्या मारत होती. मनून विचारल"आई हे पाणी असं निळं निळं का ग दिसतय?" आई म्हणाली"अग, त्या तलावाला खाली निळ्या फरशा लावल्यात ना, म्हणून पाणी निळं दिसतंय"

प्रश्न

१) आईने मनूला कुठे नेले?

२) मनूला तलाव कसा दिसला?

३) मुले काय करीत होती?

४) मनूला कशाची गंमत वाटली?

५) तलावातील पाणी निळे का दिसते?

---

आली दिवाळी. आली दिवाळी. आली.
सगळी जण गोळा झाली
आकाशदिवा उंच लावला
पणतीत तेल वात घाला
रंगीत रांगोळी काढा दारात
खूप फटाके वाजवा जोरात
घरात लाडू चिवडा चकली
फराळाची तर मजा आली

---

## बहिणी

आरुषी आणि सुरभी बहिणी आहेत . आरुषी आणि सुरभी पहिलीत आहेत . आरुषी आणि सुरभी दिसतात सारख्या पण अगदी वेगळ्या आहेत .

सुरभीला खेळायला आवडते . सुरभीचे केस छोटे आहेत . ती खेळायला जाताना केस घट्ट बांधते . तिला खेळाचे कपडे घालायला आवडतात . शाळेत सुरभीला मधली सुट्टी आवडते . सुरभीला आंबा आवडतो . मोठेपणी सुरभी खेळाडू होणार आहे .

आरुषीला वाचायला आवडते आणि चित्र काढायला आवडतात . आरुषीचे केस लांब आहेत . रोज ती केसात छान रिबन बांधते आणि रंगीत कपडे घालते . तिला शाळेत वाचनाचा तास आवडतो . आरुषीला संत्र आवडते . मोठेपणी आरुषी शिक्षिका होणार आहे .

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून द्या . (प्रत्येकी गुण ३)

१. आरुषी आणि सुरभी कोण आहेत ?
२. सुरभीचे केस कसे आहेत ? ती केसांचे काय करते ?
३. सुरभीला शाळेत काय आवडते ?
४. आरुषीला कोणते फळ आवडते ?
५. आरुषी मोठेपणी कोण होणार आहे ?